महाराष्ट्र शासन
# उपजिल्हा रुग्णालय, बदलापूर जि. ठाणे
कारमेल हायस्कुल समोर बदलापूर, (पू.) ४२१५०३
☎ कार्यालय दुरध्वनी क्र. - ई मेल - rhbadlapur@gmail.com

जा. क्र आस्था/उजिरुबदलापूर/दरपत्रक/ स्वच्छता सेवा/मनुष्यबळ/ 1118 /२६
दिनांक :- १७.०४.२०२६

## दरपत्रक सुचना

वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, बदलापूर जि. ठाणे या रुग्णालयातील व रुग्णालय परिसरातील स्वच्छता करणेकरिता बाहयंयंत्रणेद्वारे स्वच्छता सेवा बाबत दरकरार करण्यासाठी सिलबंद लिफाफातुन दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | प्रतिदिन प्रति व्यक्ती | GST रक्कम | | एकूण रक्कम | दरपत्रक कालावधी | दरपत्रक सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | टक्केवारी | रक्कम | | | |
| १. | उपजिल्हा रुग्णालय, बदलापूर येथील रुग्णालय, रुग्णालयातील कक्ष, टॉयलेट व बाथरुम तसेच रुग्णालयीन परिसराची स्वच्छता करणे | | | | | दि.२०/०४/२०२६ ते दि.२७/०४/२०२६ ( कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन ) | दि. २७/०४/२०२६ दुपारी २.०० वाजे पर्यत |

प्राप्त दरपत्रके दिनांक २७.०४.२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजता उघडण्यात येतील.

दरपत्रक सादर करताना त्यामध्ये खालील बाबीचा समावेश करणे अनिवार्य आहे.

अटी व शर्ती :-

१. मुंबई दुकाने व आस्थापना कायदा १९४८ अंतर्गत नोंदणी केलेले वैध प्रमाणपत्र आवश्यक (शॉप ॲक्ट )
२. दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर संबधित पुरवठादार संस्थेच्या लेटरहेडवरच सादर करण्यात यावे
३. दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्यांचा,बदल करण्यांचा अथवा संख्यात्मक बदल करण्याचा अधिकार वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, बदलापूर जि. ठाणे यांनी राखुन ठेवला आहे.
४. अटी व शर्तीसह असलेले दरपत्रक स्विकारण्यांत येणार नाही.

५. दरपत्रकात नमुद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा जास्त नसावे.
६. दरपत्रकामध्ये खाडाखोड केल्याचे आढळल्यास दरपत्रक स्विकारण्यांत येणार नाही.
७. विहीत मुदतीत सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यांत येणार नाही.
८. दरपत्रकात नमुद केलेले दर /किंमत सर्व करासहीत असावे.
९. दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर स्थानिक बाजारातील मान्यता प्राप्त संस्थांचाच विचार करण्यांत येईल.
१०. दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर संबधित पुरवठादार संस्थेच्या लेटरहेडवर SGST/CGST/VAT/CST क्रमांक असणे आवश्यक आहे.
११. सर्व कराराच्या अटी व शर्तीनुसार, खात्री झाल्यानंतरच देयकाची अदायगी करण्यांत येईल.
१२. दरपत्रकात कोणतेही बाबीच्या न्युनतम दरात साम्य आढळुन आल्यास विभागुन देणे अथवा एखादयाचा दर स्विकारणे याबाबतचा अंतिम निर्णय समितीचा असेल.
१३. पोस्टाने पाठविलेले दरपत्रक उशीराने प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.तसेच मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.
१४. न्युनतम-१ (L-१) दरपत्रकाधारकास मंजूर पदपत्रकाप्रमाणे विविह कालावधीत दरपत्रकातील बाबींचा पुरवठा करणे शक्य न झाल्यास व त्यांचे काम असमाधानकारक असल्यास न्युनतम -२ (L-२) दरपकाधारकास सदरचे काम देण्यात येईल.
१५. मंजूर दरपत्रकामधील कर्मचा-यांची बाहयंयंत्रणेद्वारे स्वच्छता सेवा करण्यासाठी केलेली नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची व दैनिक मजूरीवर असणार आहे. सदर दरपत्रकाधारकास कोणतेही शासकीय भत्ते व लाभ देय असणार नाहीत.
१६. आवश्यकतेनुसार वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, बदलापूर यांचेकडून कर्मचा-यांची संख्या निश्चित करण्यात येईल.
१७. पात्र दरपत्रकधारकास पुरवठा आदेश मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, ठाणे यांचे मजूरीनंतर देण्यात येतील व सदरचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून ई-निविदा होईपर्यंत तात्पुरत्या कालावधीकरिता आहेत. याची दरपत्रकधारकांनी नोंद घ्यावी.
१८. पॅनकार्ड ची छायांकित प्रत
१९. GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र देण्यांत यावे.
२०. दरपत्रक सादर करणारी संस्था शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेली नसावी. (याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.)

<u>दरपत्रक नोटीस लावण्याचे ठिकाण :-</u>

१. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, ठाणे
२. वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, बदलापूर जि. ठाणे
३. www.nrhm.maharashtra.gov.in
4. www.arogya. maharashtra.gov.in

(डॉ.जोत्स्ना सावंत)
वैद्यकीय अधीक्षक वर्ग-१,
उपजिल्हा रुग्णालय, बदलापूर

Medical Superintendent CL-1
Sub Dist. Hospital, Badlapur
Tal. Ambernath, Dist. Thane